Pune Police

## प्रेस नोट दिनांक ०५/०७/२०१८

## पुणे शहरामधील बसस्टाफ, गर्दीच्या ठिकाणी मोबाईल चोरणाऱ्या आरोपीस युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरने केली अटक

मा. वरीष्ठ अधिकारी यांनी पुणे शहरातील गर्दीच्या ठिकाणी गस्त घालण्याचे आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने युनिट-१ कडील अधिकारी व कर्मचारी युनिट-१ च्या हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना **पोलीस हवालदार अशोक माने व प्रकाश लोखंडे**, यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम स्वारगेट बसस्टाफ येथे पाठीवर काळ्या रंगाची बॅग घेवुन, संशयीत रित्या फिरत असुन, तो रोडने ये-जा करणाऱ्या लोकांना कमी किमंती मध्ये मोबाईल फोन विक्री करीत असल्याची खात्रीशीर बातमी प्राप्त झाली. सदर बातमीचा आशय श्री.नितीन भोसले-पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा युनिट १ यांना कळविला असता, त्यांनी सदर बाबत योग्य ते मार्गदर्शन करुन, कायदेशीर कारवाई करण्याचे आदेशीत केले. युनिट-१ कडील स्टाफच्या मदतीने सदर इसमास ताब्यात घेवुन त्यास नांवं पत्ता विचारता त्याने आपले नांव **नागनाथ रामभाऊ सुतवणे वय ३८ वर्षे, रा. घर नं.२९,दगडी चाळ, फुरसुंगी, पावर हॉऊस, पुणे.** असे असल्याचे सांगितले. त्याचे ताब्यातील हॅन्ड बॅगची पाहणी करता त्यामध्ये XOLO कंपनीचा १, SPICE कंपनीचा १, INTEX कंपनीचा २, MICROMAX कंपनीचा २, DISCO कंपनीचा १, LYF कंपनीचा १, SAMSUNG कंपनीचे ६, ZIOX कंपनीचा १, NOKIA कंपनीचा १, KARBONN कंपनीचे ३, LAVA कंपनीचे २, OPPO कंपनीचा १, I–KALL कंपनीचा १, OPAL कंपनीचा १, असे एकुण **कि.रु. १,०९,५००/- चे** २४ मोबाईल हॅन्डसेट मिळुन आले आहेत.

स्वारगेट बसस्टॅन्ड व परीसरातुन कोणाचे मोबाईल फोन चोरी गेले असल्यास त्यांनी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे संपर्क करुन, आपले मोबाईल फोन घेवुन जावे असे पोलीसांतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, पोलीस उप-निरीक्षक, हर्षल कदम, दिनेश पाटील, व पोलीस कर्मचारी अशोक माने, प्रकाश लोखंडे, गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, सुधाकर माने, मेहबुब मोकाशी, तुषार माळवदकर, राजू पवार, सचिन जाधव, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, रिजवान जिनेडी, तुषार खडके, इम्रान शेख, सुभाष पिंगळे, विजेसिंग वसावे, यांनी केली आहे.

पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पुणे शहर

